# पुत्रवती भव!

''मौसीजींनी तुम्हांला आत बोलावलंय.'' सरिताने सांगितल्यावर शरद उठला आणि तिच्याबरोबर आत जायला निघाला.

घरात– आत आणि बाहेर – उत्सवाचे वातावरण होते. अनेक वर्षांनी चार मुलींच्या पाठीवर दीपक पांडेला पुत्रलाभ झाला होता. आज नवजात बालकाचे बारसे व्हायचे होते. घरात बायकांची गडबड चालू होती तर बाहेर दीपक आपल्या मित्रांकडून, परिचितांकडून 'बधाई' घेत होता. शरद हा त्याचा बालमित्र, पण आज त्याची येथे उपस्थिती अनपेक्षित होती. सरकारी कामासाठी – इंटरव्ह्यूचा एक्स्पर्ट म्हणून – तो दोन दिवस अजमेरमध्ये होता. दीपकच्या मुलाच्या बारशाला म्हणून त्याने मुक्काम एक दिवस लांबवला होता. किती आनंद झाला दीपकला त्याच्या भेटीने! शाळेच्या आठवणी, लहानपणाच्या मित्रांच्या आणि शत्रूंच्या हकीकती... कितीतरी विषय गप्पा मारायला होते – वेळच पुरेसा नव्हता. त्यांची बडबड चालू असतानाच मौसीजींचे – दीपकच्या आईचे – बोलावणे आले.

''मौसीजींना तुम्हांला काही विशेष सांगायचं आहे. पण उगीच तुम्ही त्यांच्याशी वाद घालू नका.'' सरिताने हळूच बजावले.

शरदने तिच्याकडे पाहिले. तिचा चेहरा गोरामोरा झालेला दिसत होता. मौसीजी काय सांगणार ह्याची तिला कल्पना असावी. आणि ते आपल्याला अप्रिय वाटणारे असले पाहिजे. मौसीजी कशाबद्दल बोलणार याची त्याला पण थोडी कल्पना आली. त्याच्या चेहऱ्यावर स्मित झळकले.

घरातील गोंगाटापासून सुरक्षित असलेल्या एकमेव लहानशा खोलीत मौसीजी बसल्या होत्या. शरदने वाकून नमस्कार केला.

''आओ बेटे! बैठो मेरे पास. कितने दिन के बाद मिल रहे हो!'' मौसीजींनी प्रेमाने त्याला आपल्याजवळ गादीवर बसवले. सरिता बाहेर जायला लागली, पण मौसीजींनी तिला पण बसवले. ''मला जे काही सांगायचंय ते तुम्हा दोघांच्या हिताचं आहे.'' त्या हिंदीत म्हणाल्या.

''तुम्ही माझ्या लहानपणापासून माझ्या कल्याणाच्या गोष्टी सांगत व करत

आल्या आहात.'' शरद त्यांच्या शुभ्र केसाखालच्या भारदस्त चेहऱ्याकडे पाहत म्हणाला.

''हो, पण तू आता लहान नाहीस! मोठा शास्त्रज्ञ झाला आहेस. कशाला ऐकशील ह्या भोळसट म्हातारीचं बोलणं?''

''तुम्ही बेलाशक सांगा. ऐकायला माझी काही हरकत नाही. प्रण मला पटलं मात्र पाहिजे--?''

''अगदी लहानपणीसुद्धा असाच वाद घालायचास तू!'' मौसीजी कौतुकाने म्हणाल्या. ''मला वाटतं, हाडाच्या शास्त्रज्ञात चिकित्सक वृत्ती जन्मजात असावी.''

सरिताने नवऱ्याकडे पाहिले. तिच्या नजरेतली वॉर्निंग शरदने ओळखली. वाद घालायचा नाही. मौसीजी बोलू लागल्या.

''तुला तीन मुली आहेत असं समजलं. सरितानं त्यांचे फोटो दाखवले. सुंदर आणि चुणचुणीत आहेत. मोठी तुझ्यासारखी हुशार आहे असं कळलं. फार आनंद झाला. धाकट्या दोघी जुळ्या आहेत काय? त्या पण बघ नक्कीच मोठ्या झाल्यावर हुशारी दाखवतील. त्यांना का नाही आणलंस?''

''इतक्या लांब तीनचार दिवसांकरता आणणं सोयीचं नव्हतं. त्या मजेत असतील आजोळी.'' शरदने खुलासा केला. मौसीजींचा रोख कोणीकडे आहे हे त्याने ओळखले. त्या केव्हा मुद्यावर येतील याची तो वाट पाहू लागला.

पण त्याला फार थांबावे लागले नाही. मौसीजी लगेच पुढे म्हणाल्या, ''आता ह्या सोन्यासारख्या मुलींच्या पाठचा भाऊ नको का?''

शरदकडे उत्तर तयार होते.

''तीन मुलं म्हणजे पुष्कळ झाली. संतति-नियमनाची देशाला - देशालाच काय, जगाला - अत्यंत आवश्यकता असताना माझ्यासारख्या सुशिक्षित शास्त्रज्ञानं तरी संयम दाखवायला नको का?''

''तुझ्या जुळ्या मुली म्हणजे आपण एकच समजू.'' मौसीजी पण वाद घालण्यात पटाईत होत्या. ''पण ह्या तुझ्या मुली मोठ्या झाल्या की दुसऱ्याच्या घरी जाणार. तुझ्या घराण्याचं नाव पुढं कसं चालणार?''

''आम्ही साने मंडळी म्हणजे कुठल्या सिंहासनावर बसलेलो नाही, की आमचा वंश पुढे चाललाच पाहिजे.'' शरद शांत स्वरात म्हणाला.

''अरे, पण तुझ्यासारखा जागतिक कीर्तीचा शास्त्रज्ञ-त्याच्या बुद्धीचा वारसा तरी पुढे जायला नको का?''

''मौसींनी, बुद्धीचा वारसा आईवडिलांकडून मुलांच्याकडे जातो का, आणि जात असला तर किती प्रमाणात, हे अजून नक्की माहीत नाही. समजा, जात असला तर तो माझ्या मुलींच्याकडे जाईलच. त्यासाठी मुलगा कशाला पाहिजे?''

''तू काही म्हण, पण सध्याची सामाजिक परिस्थितीच अशी आहे की बापाचं नाव मुलगाच चालवतो, मुली नाही.'' मौसीजी उत्तरल्या.

''नाव चालवण्याला मी महत्त्व देत नाही. माझं नाव जर पुढं टिकून राहायचं असेल तर ते माझ्या कार्यामुळं, संशोधनामुळं राहील. न्यूटन, मॅक्स्वेल, फॅरॅडे, आइन्स्टाइन, डार्विन... किती तरी शास्त्रज्ञांची नावं अनेक वर्षांनंतर, शतकांनंतर टिकून आहेत ती काही त्यांच्या मुलांमुळं नव्हेत. माझं संशोधन त्यांच्या तोडीचं नसलं तरी माझ्या पश्चात माझं नाव काही वर्षे तरी टिकवू शकेल.'' शरदच्या स्वरात आत्मविश्वास होता.

''बरं, म्हातापणची काठी म्हणून तरी मुलाला महत्त्व देशील की नाही?'' मौसीजींनी एकदम पवित्रा बदलला.

ह्या प्रश्नाचे उत्तर पण शरदजवळ होते.

''तो जमाना आता जात चाललाय. पाश्चात्त्य देशातलं वारं आता इकडे जास्तच जास्त वाहू लागलं आहे. मला वाटत नाही आणखी तीस वर्षांनी ह्या तुमच्या मुद्याला फार महत्त्व राहील. बरं पण मौसीजी, जरी मी तुमचे सर्व मुद्दे मान्य केले तरी तुम्ही ह्याची खात्री देऊ शकाल काय की सरितानं आणि मी परत प्रयत्न केला तर आम्हांला मुलगाच होईल? जर आम्हांला परत कन्यारत्नच झालं तरी तुम्ही बायकाच परत सरिताकडे पाहून नाक मुरडाल!'' जुळ्या मुली झाल्या तेव्हा सरिताला मावश्या-काक्यांनी केलेले 'उपदेश' त्याच्या कानी आले होते. ते आठवले की नेहमी त्याच्या मनाचा जळफळाट होई.

''अरे, त्याचकरता तर मी तुला इकडे बोलावलं.'' मौसीजी म्हणाल्या, ''दीपकला ज्या उपासाचा फायदा झाला तोच तुला पण वापरून पाहायला काय हरकत आहे?''

''दीपकनं कशाचा फायदा घेतला?''

''तो कृष्णानंद स्वामीजींकडे गेला. त्यांनी दिलेल्या प्रसादानं नक्की मुलगा होतो अशी ख्याती आहे. आज त्यांच्याच प्रसादानं दीपकला पुत्ररत्न लाभलं.''

मौसीजींना आगाऊ कल्पना असतील तर त्यांनी शरदजवळ हा विषय काढला नसता. अंधश्रद्धा, फलज्योतिष इत्यादींबद्दल त्याच्या मनात विलक्षण

चीड होती. वैज्ञानिक दृष्टिकोन प्रत्यक्ष आचरणात आणायचा त्याचा प्रयत्न असे, कुठलीही गोष्ट व्यवस्थित तपासल्याशिवाय मान्य करायची नाही हा त्याचा बाणा होता. मौसीजींच्या सूचनेमुळे त्याच्या मनात किती क्षोभ निर्माण झाला असेल ह्याची सरिताला कल्पना होती. तिने हळूच त्याचा हात दाबला. शरदने स्वतःला आवरले आणि कसेबसे उद्‌गारला,

‘‘बरं मौसीजी! मी दीपककडून स्वामीजींची माहिती काढीन. आता मला गेलं पाहिजे.’’ त्याने निरोप घेतला. सरिताने वाकून नमस्कार केला तेव्हा मौसीजींनी आशीर्वाद दिला, ‘‘पुत्रवती भव!’’

शरद आणि सरिता सर्किट हाऊसवर पोचले तेव्हा सूर्यास्त होण्याची वेळ झाली होती. पण अजून जेवायला अवकाश होता. जवळच्या अनासागर तलावाशेजारी बांधलेल्या मोगलकालीन बारादरीवर ते फिरायला निघाले, दोघांची मुद्रा गंभीर होती.

‘‘माझ्या आधी तुला मौसीजींनी लेक्चर दिलं असणार!’’ चेहऱ्यावर उसने हास्य आणत शरद म्हणाला.

‘‘त्यात काही नवीन नाही. मला आता त्याची सवय झाली आहे. मला वाईट वाटतं की माझ्यामुळं तुला पण हे ऐकावं लागलं.’’ इतर कोणी जवळ नसले की सरिता त्याला एकवचनाने संबोधत असे.

‘‘त्यात तुझा काय दोष? मुलगा होणार की मुलगी हे आई किंवा बाप कोणीच ठरवू शकत नाहीत. आणि त्यातूनही मुलगी होणं म्हणजे दोष आणि मुलगा होणं म्हणजे गुण हे मानायला मी तयार नाही.’’

‘‘पण समाजाची दृष्टी वेगळी असते. तुझे विचार सयुक्तिक, तर्कसंगत वगैरे वगैरे असले तरी ते सामान्य माणसाला पटतीलच असं नाही. मूल हे आईच्या पोटातून बाहेर येतं– तेव्हा ते कुठल्या प्रकारचं आहे याची जबाबदारी आईवरच टाकण्यात येते. आपल्या रूढींनी ठरवलंय की मुलगा म्हणजे कुलदीपक – महत्त्वाचा– आणि मुलगी म्हणजे ‘अर्थो हि कन्या परकीय एव’!’’ सरिता म्हणाली.

‘‘ज्या देशातील पुराणात गार्गी, सीता, पार्वती अशा स्त्रियांच्या गोष्टी आहेत, जिथल्या इतिहासात जिजाबाई आणि झाशीची राणी ह्यांना गौरवाचं स्थान आहे – जिथे अलीकडे एक स्त्री प्रधानमंत्रिपद मिळवू शकते, तिथे समाजाची दृष्टी ही अशी का असावी?... जाऊ दे! आकाशाचे रंग पाहा किती सुंदर दिसत आहेत.’’ शरदने विषय बदलला.

दोघांच्या येरझारा चालू होत्या. मनात विचारांचे काहूर माजले असल्याने बोलणे खुंटले होते. अखेर सरिताने मौनभंग केला.

"एक प्रश्न विचारू?"

"विचार."

"विज्ञानाने ह्या शतकात इतकी झपाट्यानं प्रगती केली. खुद्द तुझ्या जीवशास्त्राच्या विषयात महत्त्वाचे शोध लागले. पण आईबापांना आगाऊच होणाऱ्या बालकाचं लिंग ठरवता येईल अशी शक्यता अजून विज्ञानाला निर्माण करता आली नाही का?"

शरद स्तब्ध झाला. सरिताच्या प्रश्नाने त्याच्यापुढे मोठे संकट निर्माण झाले होते.

"चल, आपण एका बाकावर बसू." दोघे शेजारच्या पार्ककडे वळले.

बाकावर स्थानापन्न झाल्यावर शरदने विचारले, "तू हा प्रश्न का विचारलास? आजच्या अनुभवामुळं?"

"ते कारण असेल. पण नाहीतरी मी तुला हा प्रश्न आज ना उद्या विचारणारच होते. गेले काही दिवस तू झोपेत बडबडत असतोस. मला त्यातलं काही कळत नाही; पण जे काही कानावरून गेले त्यामुळं मला वाटतं, तुझं अलीकडचं संशोधन ह्या विषयावर चालू आहे. तुला माहीत नसेल, पण मी जवळून पाहतेय– तू गेले कित्येक दिवस तंद्रीत असल्यासारखा वागतोस." सरिता म्हणाली.

"तुला सांगावं की नाही ह्या विचारात अलीकडे मी आहे – पण आता तूच आपण होऊन विषय काढलास म्हणून सांगतो. मात्र मी जे काही सांगेन ते गुप्त राहिलं पाहिजे." शरद म्हणाला.

"बायका गोष्टी गुप्त राखू शकत नाहीत अशा कल्पनेनं तू मला सांगणार नव्हतास का?" हसून सरिताने विचारले.

"नाही! त्या बाबतीत मला तुझी खात्री आहे. माझ्या शंकेचं कारण तुला कळेलच." शरदने आपल्या संशोधनाबद्दल सांगायला सुरुवात केली. "वैज्ञानिक शोध म्हणजे निसर्ग आणि मानव यांच्यात चालू असलेल्या झगड्यातले महत्त्वाचे टप्पे असतात. सृष्टीचे नियम काय आहेत ते शोधून काढायला शास्त्रज्ञ झटत असतात. काही कोडी उकलायला अविरत परिश्रम लागतात तर काही कोडी अचानक उकलतात – तिथे शास्त्रज्ञ अमुक एक गोष्ट शोधतोय अशी परिस्थिती नसते. खगोलशास्त्रज्ञांना 'पल्सार'चा शोध असा अनपेक्षितपणं लागला."

"होय, पण असे शोध लागण्यामागंसुद्धा शास्त्रज्ञाची जागरूकता असते. जॉसलिन बेलनं अंतराळातून येणाऱ्या रेडिओ लहरींमधली नियमितता जर पाहिली नसतील तर पल्सारचा शोध लागला नसता." सरिता वैज्ञानिक नसली तरी तिला आधुनिक वैज्ञानिक प्रगतीची बरीच कल्पना होती.

"मी शास्त्राज्ञाचे श्रेय हिरावून घेत नाही! उलट, अचानक लागणाऱ्या शोधामागं निसर्गानं किंचित उघडं केलेलं रहस्य – जे इतरांना दिसलं नाही ते– पाहून त्याचा पूर्ण उलगडा करणं ह्यामागंसुद्धा कर्तबगारी असते. मला म्हणायचं होतं की या प्रकारचे शोध बरेच वेळा 'बाय चान्स' लागतात. निसर्गाने शास्त्रज्ञाला दिलेला तो एक बोनस असतो. मला अशा तऱ्हेचा एक बोनस अलीकडे मिळाला."

सरिता स्तब्धपणे ऐकत होती. शरदला काहीतरी महत्त्वाचे सांगायचेय याची तिला जाणीव झाली.

"ह्या विश्वात जीवसृष्टी निर्माण होते हा एक मोठा चमत्कार आहे. सजीव आणि निर्जीव यांच्यातला भेद, वेगवेगळ्या जीवांच्यामध्ये समानतेनं आढळणाऱ्या मूळ गोष्टी, एका पिढीतून दुसऱ्या पिढीत उतरणारे गुणदोष ह्यांबद्दल महत्त्वाचे शोध लागत आहेत. पण अजून अनेक प्रश्न सुटायचे आहेत. तू उपस्थित केलेला हा अशापैकीच समजला जातो.

तुला 'जीन' आणि 'क्रोमोझोम' यांच्याबद्दल माहिती आहेज. x आणि y तऱ्हेचे क्रोमोझोम लिंग ठरवतात. नर xy चा तर तर मादी xx ची. नर आणि मादी यांचा संयोग होऊन नवीन जीव निर्माण झाला की तो नरापासून एक x किंवा y आणि मादीपासून एक x क्रोमोझोम घेतो, आणि त्यानुसार त्याचे लिंग ठरते. प्रत्यक्ष जीवनिर्मितीच्या क्षणी हा निर्णय घेतला जातो आणि त्याप्रमाणं आईच्या पोटात वाढणाऱ्या गर्भाचं लिंग ठरलं जातं.

विश्वात स्त्री–पुरुषांची संख्या समान असावी ह्या हेतूनं निसर्गानं हा नियम बनवला असावा. कारण xx किंवा xy ह्या दोन्हींपैकी नवीन अपत्यात कुठला संयोग व्हावा ह्याचा कंट्रोल अद्यापि शक्य झालेला नाही. नाणेफेक केल्यावर छापा किंवा काटा वर असेल त्याचप्रमाणं 'बाय चान्स' xx किंवा xy हा निर्णय घेतला जातो.

ही झाली सृष्टीनं आखून दिलेली परंपरा. तीत ढवळावढळ करणं अद्याप मानवाला शक्य झालं नव्हतं. समजा, स्त्री–पुरुषांचा संयोग होण्यापूर्वी काही उपायानं पुरुषातल्या x ला स्त्रीतल्या x शी जोडी करू दिली नाही तर नवीन

होणारा जीव नक्की xy वाला म्हणजे नर असेल. त्याचप्रमाणे y आणि x ची जोडी टाळता आली तर xx म्हणजे मुलगी होणार हे नक्की.

हे सैद्धांतिक दृष्ट्या सोपं वाटलं तरी प्रत्यक्षात अतिशय अवघड आहे. कारण आपल्या नियमात ढवळाढवळ होऊ नये म्हणून सृष्टीने अनेक अडथळे निर्माण केले आहेत. पण दैवयोगानं हे अडथळे पार करून जाण्याची एक गुरुकिल्ली अचानकपणं माझ्या हाती आली.

काही वेगळे प्रयोग करताना मला हा शोध लागला. प्रथम ती एक अंधुकशी शक्यता वाटली. पण मी हात धुऊन तिच्या मागं लागलो आणि दोन वर्षांच्या प्रयत्नांनंतर मला आता यश मिळालंय असं वाटलं. थोडक्यात सांगायचं म्हणजे मी एक असं द्रव्य तयार केलंय की जर योग्य वेळी ते मादीच्या शरीरात वाढलं तर त्यामुळं नराकडून येणाऱ्या x चा अवरोध होऊन नवीन जीव xy चा म्हणजे नर असेल. त्याचप्रमाणे हटकून xx म्हणजे मादी निर्माण होईल असं द्रव्य पण तयार करायच्या प्रयत्नात मी आहे, मात्र अजून त्याला काही महिने लागतील.''

''पण ह्या द्रव्याचा प्रयोग तू करून पाहिलास?'' सरिताने विचारले.

''प्राण्यांच्यावर केला. तो यशस्वी झाला – १०० टक्के! मात्र अजून माणसांवर केला नाही. कसा करायचा हा प्रश्न आहे. मला स्वतःला जरी त्याबद्दल खात्री असली तरी 'गिनीपिग' व्हायला आपण होऊन कोणतं जोडपं तयार होईल? आपण सृष्टीच्या आखून दिलेल्या कार्यक्रमात ढवळाढवळ करत आहोत याची जाणीव होताच कोणीही असा प्रयोग स्वतःवर करून घेण्याची धास्ती घेईल.'' शरद म्हणाला.

''तुझी खात्री असल्यास मी हा प्रयोग करून द्यायला तयार आहे.'' सरिता शांतपणे म्हणाली, ''मला मुलगा हवा म्हणून नाही, जर त्यामुळं संशोधनाला चालना मिळेल म्हणून.''

''आता तुझ्या लक्षात आलं असेल मी तुला सांगायला का धजत नव्हतो ते.'' शरद म्हणाला. ''हा प्रयोग एकट्या माझ्यावर करायचा असता तर मी बेलाशक केला असता. पण इथे दोघांचा प्रश्न आहे आणि त्यातूनही हे नवं द्रव्य स्वतःच्या शरीरात घेण्याचं काम मला करायचं नाही. आपण हा प्रयोग केला तर जास्त जबाबदारी तुझ्यावर पडते.''

''माझा तुझ्या कर्तबगारीवर पूर्ण विश्वास आहे.'' त्याच्या बोटांत बोटे अडकवीत सरिता म्हणाली. शरदने कृतज्ञतेने तिचा हात दाबला.

''जर हा प्रयोग आपल्या बाबतीत सफल झाला तर मला तो इतरांच्यावर करायला हरकत वाटणार नाही. कारण शास्त्रीय दृष्टिकोणातून पाहिलं तर एका

जोडण्यावरून आपल्याला निष्कर्ष काढता येणार नाही. निदान शंभरपैकी शंभर उत्तरं बरोबर आली पाहिजेत.''

''नाव काय ठेवलंयस तुझ्या ह्या शोधाचं?''

''सध्या ते एका बाटलीत असून त्यावर 'फाइव्ह स्टार पॉयझन' असं लिहिलं आहे!'' हसून शरद म्हणाला. ''उगीच कोणी हात लावायला नको! मासिकपाळी येण्याच्या सोळा दिवस आधी ते तुला घ्यावं लागेल. डोस अगदी लहान : एक मिलिलीटरचं इंजेक्शन. औषध दिसायला पाण्यासारखं आहे.''

''चला, जेवायची वेळ झाली.'' सरिता घड्याळाकडे पाहत म्हणाली. ती दोघे बाकावरून उठली. आता अंधार पडला होता आणि पार्कमधले मंद दिवे लागले होते. वर्दळ कमी व्हायला लागली होती.

''अरे ब्रजेश! इकडे कोणीकडे?'' शरद एकदम उद्‌गारला. मंद प्रकाशात त्यांच्या जवळ एक उंच आकृती उभी राहिली होती.

''कंटाळलो घरात बसून. सारखं गाणंबजावणं आणि बायकांचा कलकलाट. नाहीतरी बारशाच्या वेळी काकाला काही महत्त्व नसतंच!'' ब्रजेश हा दीपकचा भाऊ होता.

''ये केव्हातरी मुंबईला आमच्याकडे.'' शरदने आमंत्रण दिले.

''हो, येईनच वर्षभरात केव्हातरी! ह्या अजमेरसारख्या छोट्या गावात माझ्या टॅलेंटला काही स्कोप नाही. माझा मुंबईतला मामा बोलावतोय अनेक दिवसांपासून.''

ब्रजेशची टॅलेंट कशामध्ये आहे हे शरदला माहीत नव्हते. फार काय, ब्रजेशच्या कुटुंबीयांना पण हा प्रश्न होता.

*प्रिय शरद,*

*पुत्रजन्माबद्दल अभिनंदन! मला आमंत्रण पाठवल्याबद्दल धन्यवाद. पण इथल्या परीक्षेच्या भानगडीमुळे मला येता येणार नाही. मात्र ब्रजेश बरेच दिवसांपासून मुंबईला जायचे म्हणतो. त्याच्याबरोबर तुझ्या युवराजासाठी लहानशी भेट पाठवत आहे.*

*तुझा मित्र*

**दीपक**

*ता. क. : तुझ्या मौसीजी फार खूष आहेत.*
*तू कृष्णानंदस्वामींना भेटलास का, म्हणून त्यांनी विचारले आहे!*

*–दी.*

शरदने पत्र वाचून सरीताकडे दिले. ताजा कलम पाहून सरिता हसून म्हणाली, "कृष्णानंद नाही तरी शरदस्वामींचा प्रसाद गुणकारी ठरला म्हणायचा! शरद, तुझं अभिनंदन!"

"नाही सरिता, याचं सर्व श्रेय तुलाच दिलं पाहिजे. माझ्यावर विश्वास टाकून तू स्वतःवर प्रयोग करून घेतलास! ही केवढी जोखीम होती याची मला आत्ता कुठे जाणीव होते! काही झालं तरी नैसर्गिक नियमांशी हा नवा खेळ होता. समजा, त्याचे भलते परिणाम झाले असते तर? पण आता मला हा प्रयोग दुसऱ्यांवर करायला भीती वाटणार नाही."

"आणि तुझं दुसरं 'फाइव्ह स्टार पॉयझन' तयार झालं का?" कन्याप्राप्ती करून देणाऱ्या औषधाकडे सरिताच्या प्रश्नाचा रोख होता.

"होय, नुकतंच तयार झालंय; मात्र त्याला मी 'सिक्स स्टार पॉयझन' असं नाव दिलंय. दोन्ही बाटल्या शेजारी शेजारी आहेत." शरद म्हणाला.

इतक्यात फोनची घंटा वाजली.

"कोण, ब्रजेश? पोचलास का इतक्यात मामाकडे?" शरदने फोन घेऊन विचारले.

"होय! उद्या तुझ्या पार्टीला येणारच आहे. पण तेव्हा गडबड असेल. मला निवांतपणं तुझी प्रयोगशाळा दाखवशील का? अर्थात मला काही त्यातलं कळणार नाही! पण उत्सुकता आहे–"

"जरूर, परवा सकाळी ये. शनिवार असल्यानं सुट्टी आहे. मी तुला शांतपणे सर्व दाखवीन." शरदने आश्वासन दिले.

त्यानंतर सोमवारी शरद प्रयोगशाळेत गेला तो एका नव्या उत्साहाने. आज आपल्या शोधाचे प्रयोग इतर जोडप्यांवर करून पाहायचे त्याने ठरवले. अजूनपर्यंत त्याने ह्या शोधाबद्दल आपल्या सहकाऱ्यांना सांगितले नव्हते. पण आज त्याने निवडक लोकांना विश्वासात घेतले. अजून शोधाची वाच्यता करण्यात अर्थ नाही हे त्याचे विधान त्यांना पटले. कारण कुठलाही प्रयोग व्यवस्थित पडताळून पाहिल्याशिवाय त्याचे निकाल ग्राह्य समजायचे नाहीत हे हाडाच्या शास्त्रज्ञांना वेगळे सांगावे लागत नाही.

प्रयोग करून घेण्यास उपयुक्त जोडपी मिळायला त्यांना त्रास पडला नाही. मात्र त्यांनी जमवलेल्या वीसही जोडप्यांना मुलगाच पाहिजे होता.

"तुझ्या 'सिक्स स्टार'ला कोणी गिऱ्हाईक दिसत नाही!" त्याचा एक सहकारी गमतीने म्हणाला.

"मला ती कल्पना होती. पण काही हरकत नाही. निदान फाइव्ह स्टारची चाचणी तर होईल." शरद उद्गारला.

वीसही बायकांना योग्य वेळी फाइव्ह स्टारचे इंजेक्शन देण्यात आले. त्यांना दिवस गेले. शरदचा प्रयोग सुरू झाला. पुढच्या नऊदहा महिन्यांत निकाल लागायचे होते.

"विसांपैकी सोळा तरी मुलगे पाहिजेत –" त्याचे सहकारी म्हणत.

"विसांपैकी वीस मिळाल्याशिवाय मला समाधान वाटणार नाही – इतकी मला खात्री आहे." शरद आपल्या सहकाऱ्यांना ठासून सांगे.

दरम्यान त्याला दीपककडून पत्र आले. ब्रजेश मुंबईहून परत अजमेरला आला नव्हता. सर्व जण काळजीत होते. शरदने ब्रजेशच्या मामाला फोन केला. मामाने सांगितले, "मला पण काल पत्र आलं दीपककडून. त्या दिवशी– शनिवारी, मला वाटतं – तो तुमची प्रयोगशाळा बघून आला. त्याच रात्री तो गुजरात मेलमध्ये बसला. मी त्याला पोचवायला गेलो होतो. पण लगेच तो अजमेरला जाणार नव्हता. त्याला गुजरात आणि राजस्थानमध्ये भटकायचं होतं. म्हणून मी फार काळजी करत नाही – आहेच तो भटक्या!"

आपल्या संशोधनात व्यग्र असल्यामुळे शरदने पण फार चौकशी केली नाही. जसजसे निकालाचे दिवस जवळ यायला लागले तसतसा त्याचा आत्मविश्वास ढासळू लागला. मात्र स्वतःच्या शंका तो फक्त सरिताजवळ बोलून दाखवे.

"मला तुझ्यापेक्षा जास्त खात्री आहे तुझ्या सामर्थ्याबद्दल. हा पाहा माझ्याकडे पुरावा आहे!" सरिताने रांगणाऱ्या प्रकाशाकडे बोट दाखवले.

"तो पुरावा शास्त्रीय नाही. 'बाय चान्स'सुद्धा तसं घडलं असेल." शरदने तिला संख्याशास्त्राबद्दल समजावून सांगितले. विसांपैकी दहा मुलगे आणि दहा मुली नैसर्गिक नियमांत काही ढवळाढवळ न करता – बाय चान्स – अपेक्षित आहेत. विसांपैकी अकरा मुलगे, नऊ मुली किंवा बारा मुलगे, आठ मुलीसुद्धा असणे फार असंभाव्य नाही.

"मला विसापैकी किती मुलगे झाले की संख्याशास्त्रज्ञ कबूल करील की इथे नैसर्गिक नियमांपलीकडे काहीतरी घडत आहे?" सरिताने विचारले.

"सोळा किंवा जास्त मुलगे असणे नैसर्गिक दृष्ट्या शक्य असले तरी त्याची संभाव्यता फार कमी म्हणजे एक टक्क्याहून कमी असते. म्हणून संख्याशास्त्रज्ञ म्हणेल की माझ्या प्रयोगातून विसापैकी सोळा तरी मुलगे झाले पाहिजेत."

हळूहळू निकाल कळू लागले – आणि शरदला आश्चर्याचा धक्काच बसला. कसाबसा त्याने विसावी 'केस' सुटेपर्यंत दम धरला.

विसापैकी दहा मुलगे आणि दहा मुली झाल्या होत्या! शरदचा प्रयोग पूर्णपणे फसला होता.

आपल्या सहकाऱ्यांत त्याला तोंड दाखवायला जागा राहिली नव्हती. त्याला नर्व्हस ब्रेकडाऊन झाला. डॉक्टरांनी हवापालट करायला सांगितले.

शरद आणि सरिता महाबळेश्वरला एका हॉटेलात आठवडाभर होते. पण शरदला मानसिक विसावा काही मिळत नव्हता. सारखा तो आपले नोटबुक काढून त्यातील फॉर्म्युले तपासून पाही. पण कुठेही चूक दिसत नव्हती.

पण प्रत्यक्षात चूक घडली होती. कुठे?

आणि सरितावर केलेला प्रयोग तरी सफल झाला कशावरून? नैसर्गिक नियमानुसार मुलगा होण्याची संभाव्यता निम्मी असते. त्यामुळेच कशावरून मुलगा झाला नसेल?

त्याचा आत्मविश्वास कुठल्या कुठे उडून गेला होता.

विज्ञानाचे क्षेत्र सोडून दुसरे काहीतरी करावे असे त्याला वाटू लागले. पण आपल्यासाख्या 'फेल्युलर'ला दुसरे तरी काय जमणार?

सरिता त्याच्या मूड्सना कशीबशी तोंड देत होती. पण तिच्याकडे तरी कुठे उपाय होता?

सहाव्या दिवशी शरदला मुंबईहून ट्रंककॉल आला. त्याचा जवळचा सहकारी नरेश पांडे बोलत होता. फोनवर रिसेप्शन खराब होते, पण नरेश काही कारणाने उत्तेजित झालेला हे शरदला कळले.

"अरे नीट सांग–मला काही कळत नाही."

"तू आमच्यावर मोठी प्रॅक्टिकल जोक केलीस असं असं मी म्हटलं असतं–पण तुला स्वतःलाच ती भोवलेली दिसते, तेव्हा तसं नसावं!"– नरेश.

"स्पष्ट बोल – मला कोडी उलगडायला मानसिक शक्ती नाही." शरदने आवर्जले.

"मी काल तुझी फाइव्ह स्टार पॉयझनची बाटली घेऊन नीट तपासली. आतलं लिक्विड ॲनॅलाईझ केलं. हे पूर्वीच करायला हवं होतं – पण तू आम्हांला कोणाला त्याला हात लावू दिला नाहीस. आधी तुला १०० टक्के खात्री स्वतःबद्दल आणि नंतर पार ढेपाळलास! आम्हांला जरा विश्वासात घेतलं असतंस तर..."

''नरेश, तू जवळ असतास तर तुझा खून केला असता मी आत्ता! तुझ्या ॲनालिसिसचा काय निष्कर्ष आला?''

''हे तुझं फाइव्ह स्टार पॉयझन म्हणजे... हा हा हा... म्हणजे, कसं सांगू तुला... शुद्ध पाणी होतं! एच टू ओ.''

नरेशचा फोन आल्यावर शरदमध्ये कायापालट झाला. मानसिक दुबळेपणा जाऊन तेथे वेगळीच प्रेरणा निर्माण झाली. त्याने झटपट सरिताला तयार व्हायला सांगितले.

तिला आश्चर्य वाटले, पण नवऱ्यातला बदल पाहून तिला बरे वाटले. पॅकिंग पुरे करून ती तयार झाली.

महाबळेश्वर ते मुंबई कारच्या प्रवासात शरदने तिला नरेशची बातमी सांगितली. म्हणजे प्रयोग फसल्याचे कारण उमगले. पण दुसरे कोडे सुटायचे होतेः

त्याने केलेल्या औषधाचे शुद्ध पाण्यात रूपांतर कसे झाले?

केव्हा एकदा प्रयोगशाळेत जातो आणि सर्व तपासणी करतो असे त्याला झाले होते. महाबळेश्वरला जाताना बहुतेक ड्रायव्हिंग सरिताने केले होते. आता परतताना शरद करत होता – अंगात वारे संचारल्यासारखा.

सरिताला घरी पोचवून प्रयोगशाळेचा रस्ता धरला. नरेशला केव्हा भेटतो असे त्याला झाले होते.

नरेश त्याची वाटच पाहत होता. त्याने नरेशने केलेली पृथक्करणे पाहिली. मग स्वतः तपासणी केली.

फाइव्ह स्टार आणि सिक्स स्टार दोन्हींत शुद्ध पाण्याच्या व्यतिरिक्त काहीही नव्हते.

''नरेश! माझ्या नकळत कोणीतरी हा फरक केला आहे. आता आपल्यापुढे दोन कामं आहेत. एक म्हणजे ढवळाढवळ कोणी केली ती शोधून काढणं. दुसरं म्हणजे खरी औषधं पुन्हा तयार करणं.''

''तुला पुन्हा तयार करता येतील?''

''होय! सुदैवाने माझ्या सर्व नोट्स माझ्याकडे आहेत. आठवडाभरात आपण परत औषधं तयार करू शकू. माझ्या मते ते जास्त महत्त्वाचं आहे. पहिल्या कामात किती यश मिळेल शंकाच आहे.'' – शरद.

शरदचा कयास खरा ठरला. औषधांचे पाण्यात रूपांतर कोणी केले ते कळू शकले नाही. वॉचमन, लॅब-असिस्टंट, सायंटिस्ट – सर्वांना विचारले,

पण पत्ता लागला नाही. 'विष आहे – हात लावू नका' म्हटल्यावर कोणी त्या औषधांच्या वाटेला जाणार नाही असे सर्वांचे मत पडले. नैसर्गिकरीत्या ते रूपांतर झाले असावे ही शंका पण शरदने खोडून काढली. त्यातली रसायने त्या प्रकारची नव्हती.

इकडे शरदने पुन्हा ती औषधे बनवून नवीन जोडप्यांवर प्रयोग सुरू केला. पुन्हा वीस जोडपी निवडण्यात आली. मात्र ह्या वेळी शरदमध्ये पूर्वीसारखा वाजवीपेक्षा जास्त आत्मविश्वास नव्हता.

प्रयोग सुरू होऊन नऊ महिने झाले.

"शरद! पाहा तुला प्रतिस्पर्धी निर्माण झालाय." त्याच्यापुढे वर्तमानपत्र सारत सरिता म्हणाली. शरदने ब्रेकफास्ट खाता खाता बातम्यांवर नजर टाकली. सरिताने हसत त्याचे लक्ष एक मथळ्याकडे वेधले : 'मौनीबाबांचा चमत्कार.'

बातमी उत्तरप्रदेशमधील मेरठजवळच्या एका खेड्यातली होती. गेले वर्षभर तेथे मौनी मुनिराज नावाचे एक साधू राहत असून त्यांना एक सिद्धी प्राप्त असल्याची ख्याती होती. त्यांच्या कृपाप्रसादाने भाविकांना इच्छेप्रमाणे पुत्रलाभ किंवा कन्यालाभ होतो असे बातमीदाराने म्हटले होते.

"आपले लोक कशावर श्रद्धा ठेवतील सांगता येत नाही – कसला कृपाप्रसाद आणि कसली सिद्धी!" शरद स्वतःशी पुटपुटला. पण पुढील भागातील मजकूर वाचून तो स्तब्ध झाला. बातमीदाराने पुढे म्हटले होते :

"इतर चमत्कार करून दाखवणारे बाबालोक आणि साधूलोक शास्त्रज्ञांना आपल्या चमत्कारापासून लांब ठेवतात. मौनीबाबांचे तसे नाही. आपल्या प्रत्येक 'केस'ची हिस्टरी त्यांनी व्यवस्थित लिहून ठेवली असून तिची तपासणी करायचे आव्हान त्यांनी डॉक्टर लोकांना दिले. 'ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस'ने एक तपासणीपथक पाठवल्याचे कळते. ह्या पथकाने १०१५ केसेस पाहिल्या, संबंधित जोडप्यांच्या मुलाखती घेतल्या आणि आपला अहवाल तयार केला आहे. हा अहवाल अद्यापि गुप्त आहे, पण बाबाजींनी १०० टक्के बरोबर यश मिळवले तसे त्यात सिद्ध झाल्याचे अनधिकृत रीत्या कळते."

ब्रेकफास्ट भराभर संपवून शरदने प्रयोगशाळेत धाव घेतली. तिथे गेल्यावर ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसला त्याने फोन लावला. त्याच्या चांगल्या माहितीचे डॉ. खन्ना यांच्याशी संपर्क साधला आणि मौनीबाबांच्या सिद्धीबद्दल माहिती विचारली.

"पेपरमध्ये आलेली माहिती बरोबर आहे." डॉ. खन्ना म्हणाले. "मी त्या एन्क्वायरी कमिशनवर होतो. आम्ही सर्व केसेस पाहिल्या – प्रत्येक बाबतीत मौनीबाबा यशस्वी झाले."

"पण त्यांच्या अयशस्वी केसेस त्यांनी लपवल्या असत्या तर?"

"ती शक्यता आम्ही विचारात घेतली. गुप्तपोलिसांची मदत घेऊन आम्ही कसून चौकशी केली. सर्व यशस्वी केसेस बाबाजींच्या खेड्याच्या मझोली गावाच्या आसमंतातल्या आहेत. एखादी जरी केस अयशस्वी असती तरी गावकऱ्यांकडून समजली असती. आम्ही त्या गावच्या जवळचा आणि ५० मैलांच्या अंतरापर्यंतच्या सर्व गावांचा भाग तपासून पाहिला. पण एकही अयशस्वी केस आमच्या आढळात आली नाही." डॉ. खन्ना म्हणाले.

"पण बाबाजींची सिद्धी म्हणजे प्रकार काय आहे?"

"त्यांच्याजवळ एक औषध आहे. त्याचं इंजेक्शन – एक मिलिलीटरचं – बाईची मासिकपाळी येण्याच्या सोळा दिवस आधी तिला दिलं की त्यानंतर अंडं फर्टिलाइझ झाल्यास..."

"पण ते औषध तुम्ही पाहिलंय का?" शरदची उत्सुकता अनावर झाली.

"ते मात्र बाबाजी दाखवायला तयार नाहीत. आम्ही ते तपासून पाहायला मागितलं आहे. ती तपासणी होईपर्यंत आमचा अहवाल आम्ही प्रसिद्ध करणार नाही."

शरदने फोन खाली ठेवला. आपण तयार केलेले औषध बाबाजीपर्यंत पोचले आणि त्याचा वापर ते करत आहेत याची त्याला खात्री पटली. पण ते त्यांच्यापर्यंत गेले कसे? आणि ते योग्य प्रकारे वापरायची पद्धत त्यांना समजली कशी? त्याने तर फक्त सरिताला त्याची माहिती सांगितली होती. तिने कोणाला सांगितले असेल का? आणि तिचा मौनीबाबांशी संबंध काय? शरदचे डोके चालेना.

"सरिता! मी आजच मेरठकडे जाणार आहे – मौनीबाबांना भेटायला." तिच्या चेहऱ्याकडे बारकाईने पाहत शरद म्हणाला.

"मौनीबाबा?" सरिताने आश्चर्यानं विचारले. क्षणभर तिच्या लक्षात आले नाही मौनीबाबा कोण ते. मग तिला आठवले. "आज सकाळी ज्यांची बातमी आली ते?"

"होय! मला दाट शंका येते – नाही, माझी खात्री आहे – त्यांनी माझं औषध पळवलं. पण कसं ते मला माहीत नाही."

‘‘पण त्यांना त्याची माहिती कशी मिळाली?’’ सरिताने विचारले.

‘‘तेच तर मला कळत नाही. तुझ्याव्यतिरिक्त मी कोणालाही सांगितलं नव्हतं.’’ किंचित थांबून शरदने हळूच विचारले, ‘‘सरिता! चुकून का होईना, पण तू कोणाजवळ त्याबद्दल बोलली होतीस का? नीट विचार करून उत्तर दे – फार महत्त्वाची गोष्ट आहे ही.’’

सरिता आत्मविश्वासाने आणि शांतपणे म्हणाली, ‘‘मी कोणाजवळही त्याबद्दल बोलले नव्हते... तुझ्याशपथ – देवाशपथ सांगते.’’

‘‘शपथ घ्यायची जरूर नाही – माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे. मात्र ह्या प्रकारचा छडा लावायला मला मेरठला गेलंच पाहिजे.’’

शरदने प्रवासाची तयारी केली.

दोन दिवसांनी तो मझोलीला बाबाजींच्या आश्रमाजवळ पोचला. बाहेर तोबा गर्दी होती.

‘‘गर्दी बरेच दिवसांपासून आहे, पण पेपरमध्ये बातमी आल्यापासून लांबून लोक यायला लागलेत.’’ एका मझोलीकराने त्याला सांगितले. ‘‘बाबाजी दिवसा मौन पाळतात – फक्त सूर्यास्त झाल्यावर बोलतात. हे लोक फक्त दर्शनाला आलेले आहेत. रात्री तर याहून जास्त गर्दी होणार!’’

ह्या गर्दीतून बाबाजींची भेट होणार कशी? त्याच्या माहितीचे तिथे कोणीच नव्हते. वशिला लावायचा तर कोणाचा?

इतक्यात त्याला एक कल्पना सुचली. जर त्याचा तर्क खरा असेल तर ती नक्की यशस्वी होईल.

त्याने एका कागदावर काहीतरी लिहून लिफाफ्यात घालून तिथल्या आश्रमाच्या व्यवस्थापकाला दिले. ‘‘अतिशय महत्त्वाची आणि गुप्त गोष्ट आहे! तुम्ही शीघ्र बाबाजींकडे द्या. दुसऱ्या कोणाकडे देऊ नका.’’ त्याने आवर्जून सांगितले.

व्यवस्थापकाने कुरकुरत तो लिफाफा घेतला. त्याच्याखाली ५० रुपयांची नोट होती. तिचा स्पर्श झाल्यावर त्याच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले. तो आत गेला आणि थोड्या वेळाने बाहेर आला.

‘‘बाबाजी तुला मध्यरात्री भेटतील. मागल्या दाराशी ये. दार बंद असतं, पण तीन वेळा धक्के मारलेस की उघडलं जाईल.’’

रात्री बरोबर बाराला शरदने मागल्या दारावर तीन धक्के मारले. एका संन्याशाने दार उघडले. ‘काही बोलू नको’ असे खुणेने सांगून त्याने त्याला

एका लहानशा खोलीकडे नेले. आश्रमाच्या मुख्य दाराजवळ गर्दी-गोंधळ चालू होता, पण इकडे सर्व शांत होते.

''आइये! मैं आपका ही इंतजार कर रहा था.''

शरदने पाहिले - खोलीच्या एका कोपऱ्यात मृगाजिनावर एक दाढी मिश्यावाली लांब केसांची व्यक्ती बसली होती. अंगावर भगवी वस्त्रे आणि चेहरा रुबाबदार. शरदने वाकून नमस्कार केला. बाबाजींनी बसायला खूण केली. खोलीचे दार बंद करून त्यांचा हस्तक निघून गेला.

''तुम्ही केव्हातरी येणार हे मला माहीत होतं! पेपर वाचून आलात ना?'' बाबाजींनी हिंदीत विचारले.

शरदला आश्चर्य वाटले. त्याने पाठवलेला निरोप म्हणजे अंधारात सोडलेला एक बाण होता. तो लक्ष्यावर जाऊन आपटला नक्की! पण लक्ष्य काय आहे हे अजून त्याला कळत नव्हते. मौनीबाबा म्हणजे कोण?

बाबाजींनी उठून दाराला आतून कडी लावली. खिडकी बंद असल्याची खात्री केली. खोलीत फक्त एका मेणबत्तीचा प्रकाश होता.

''पहेचाना मुझे?'' बाबाजींनी हसून विचारले. शरदला काहीतरी ओळखीचे वाटत होते, पण नक्की ध्यानात येत नव्हते.

बाबाजींनी शांतपणे स्वतःच्या पांढऱ्या जटा, दाढीमिश्या बाजूला केल्या.

''ब्रजेश!'' शरदने आश्चर्याने उद्‌गारला.

''नकली केस वापरणारा काही मी पहिलाच बाबा नव्हे!'' ब्रजेश हसत म्हणाला. ''ही बुवाबाजी माझ्या टॅलेंटला योग्य आहे.''

शरदच्या डोक्यात प्रकाश पडायला लागला. आपण ब्रजेशला प्रयोगशाळा दाखवली तेव्हा तर त्याने ही अदलाबदल केली नसेल? त्या दिवशी काय काय घडले याचा तो विचार करू लागला....

''मीच मदत करतो तुला आठवायला.'' त्याच्या मनातले भाव ओळखून ब्रजेश म्हणाला. ''तू मला प्रयोगशाळा दाखवलीस आणि आपण बाहेर यायला निघालो. दाराजवळ आल्यावर मी म्हटलं की मी बरोबर आणलेलं एक पुस्तक आत विसरलो...

तू बरोबर यायला निघालास, पण मी नको म्हटलं. तू वॉचमनशी बोलत उभा होतास तोपर्यंत मी जाऊन पुस्तक घेऊन आलो. पण त्याच वेळी बरोबर आणलेल्या दोन बाटल्यांत तुझी औषधं घातली आणि तुझ्या बाटल्या डिस्टिल्ड वॉटरने भरून ठेवल्या. थोडा वेळ लागला हे करायला - पण बाथरूमला जाऊन आल्याची सबब मी सांगितली होती.''

शरदला सगळे आठवले. पण अजून प्रश्न सुटला नव्हता.

"कबूल! पण तुला ह्या औषधांबद्दल सांगितलं कुणी? मी तर फक्त सरिताला सांगितलं होतं!"

"सरिताभाभी निर्दोष आहेत. मी सर्व ऐकलं ते तुझ्याकडून!" ब्रजेश म्हणाला.

"माझ्याकडून? केव्हा? कसं?" शरदला फारच आश्चर्य वाटले.

"तुझ्या प्रश्नांची थोडक्यात उत्तरं म्हणजे, अनासागरजवळ झाडाआडून! तू सरिताभाभींना सांगत असताना मी जवळ होतो. आधी माझा ऐकायचा विचार नव्हता. पण तू सांगत असलेली माहिती मला फायद्याची होईल असं वाटलं. म्हणून मी तुमच्या बाकामागच्या झाडापलीकडेच उभा होतो." ब्रजेशने कबुली दिली.

शरदच्या डोळ्यांपुढे त्या दिवशीचे दृश्य आले – बारादरी पार्क, बाकावरचे संभाषण आणि नंतर ब्रजेशची अचानक पडलेली गाठ...

"आणि तू माझ्या शोधाचा अशा तऱ्हेने फायदा करून घेतलास!" रूक्षपणे शरद उद्गारला. त्याला आपण केलेल्या प्रयोगाची आठवण झाली, त्यानंतरचा नर्व्हस ब्रेकडाऊन डोळ्यापुढे आला. त्याने थोडक्यात ब्रजेशला हे सर्व सांगितले.

"शरदभाई! मला क्षमा कर. माझ्या कृत्यामुळं तुला विलक्षण त्रास सोसावा लागला." ब्रजेशच्या स्वरात कळकळ होती.

"बरं, झालं गेलं विसरून जा!" शरद उद्गारला. "मला हे सांग की तुझं औषध संपल्यावर तू काय करणार? का पुन्हा माझ्या प्रयोगशाळेत चक्कर टाकणार?"

"त्याची मला काळजी नाही." जटा, दाढीमिश्या परत लावत ब्रजेश म्हणाला. "फाइव्ह स्टार पॉयझन तर नुकतंच संपलं. पण त्याची बाटली पाहा!" ब्रजेशने वस्त्रातून बाटली काढून दाखवली.

बाटली भरलेली होती!

शरदच्या विस्मित चेहऱ्याकडे पाहत ब्रजेश म्हणाला, "तुम्ही शास्त्रज्ञ म्हणजे साधेभोळे असता! अरे ह्या बाटलीत आता फक्त पाणी आहे, पाणी!"

"पण त्यानं तुझा काय फायदा होणार?" शरदला स्वतःच्या अयशस्वी प्रयोगांची आठवण झाली.

"फायदा?" मोठ्याने हसत ब्रजेश उद्‌गारला, "जोपर्यंत बाहेर भाविक लोकांची गर्दी आहे आहे तोपर्यंत माझा फायदाच आहे! ऐक. मी माझ्याकडे येणाऱ्या जोडप्याला औषध देतो तेव्हा एक रामनामाचा जप पण देतो. जर तुम्ही सच्च्या दिलानं जप केला तर माझं औषध लागू होईल असं मी त्यांना सांगतो. श्रेय मी घेत नाही. कर्ताकरविता परमेश्वर आहे! अर्थात आत्तापर्यंत तुझ्या औषधानं मिळालेल्या यशामुळं श्रेय मला मिळतंच. यापुढे माझं यश शंभर टक्क्यांवरून पन्नास टक्क्यांवर येणार! हरकत नाही. भाविक जोडप्यांना वाटेल – जर त्यांना यश आलं नाही तर दोष त्याचा, माझा नव्हे. आपण जप करण्यात हयगय केली असं म्हणून ती जोडपी गप्प बसतील! आणि ज्या पन्नास टक्के जोडप्यांना यश मिळेल ते माझंच गुणगान करणार. तेव्हा तुझ्या औषधाची मला आता जरूरी नाही."

"तुझी टॅलेंट जोरात चालायला लागली आहे!" शरद म्हणाला. "जोपर्यंत सामान्य माणसात चिकित्सक बुद्धी नाही, जोपर्यंत तो चमत्कारावर विश्वास ठेवू इच्छितो, तोपर्यंत ही बुवाबाजी चालणारच. दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये!"

"एक प्रश्न विचारू?" शरदने एकदम विचारले.

"विचार! पण मला आता भजन करायला गेलं पाहिजे." ब्रजेश उठत म्हणाला.

"तुझ्याकडचं फाइव्ह स्टार पॉयझन संपलं म्हणालास!" 'सिक्स स्टार'चं काय झालं?

"ते कशासाठी आहे हे मला माहीत नव्हतं. पण मी अंदाज केला की ते बहुतेक मुलगी होण्यासाठी वापरायचं असेल. पण ते वापरायचा मला कधी प्रसंगच आला नाही."

"काय म्हणतोस! ह्या एक हजार जोडप्यांपैकी एकालाही मुलगी नको होती?" शरदने आश्चर्याने विचारले.

"एकालाही कन्यारत्न नको होतं! ही तुझी सिक्स स्टारची बाटली परत घेऊन जा." ब्रजेशने त्याच्या हातात ती बाटली दिली आणि तो दार उघडून बाहेर निघून गेला.

शरद सुन्न मनाने कितीतरी वेळ बाटली हातात घेऊन उभा होता.

मुंबईला परतल्यावर महिनाभर शरद प्रयोगशाळेकडे फिरकला नाही. त्याने मोठी सुट्टी घेऊन भारतदर्शन करायची टूम काढली – मुलाबाळांसकट.

शाळांना सुट्टी असल्याने त्याच्या प्लॅनमध्ये अडथळा आला नाही. सरिता, मुली, बाळ सर्वांना घेऊन तो ट्रिपला निघाला.

सरिताला त्याच्या वागण्याचे आश्चर्य वाटत होते. अर्थात मौनीबाबांचे रहस्य तिला त्याने आल्यावर सांगितले होते. पण त्याच्या चालू असलेल्या प्रयोगाबद्दल तो इतका उदासीन कसा? आणि तो अधूनमधून असा विचारमग्न कसा? कोणती नवीन कल्पना त्याच्या डोक्यात घर करत आहे? तिने बरेच वेळा त्याला छेडून पाहिले, पण त्याने दाद लागू दिली नाही. टूर संपवून परत मुंबईला आल्यावर त्याच्या वागण्यात फरक झाला. कुठल्यातरी गहन प्रश्न सोडवल्याचे समाधान त्याच्या चेहऱ्यावर होते.

दुसऱ्या दिवशी नरेशचा फोन आला : ''कॉंग्रेचुलेशन्स! तुझा प्रयोग पूर्णपणे यशस्वी झाला – अगदी विसापैकी वीस मार्क मिळाले. कालच शेवटची केस डिलिव्हर झाली. आता पार्टी केव्हा देणार?''

''पार्टी? जरूर तुम्हीच ठरवा केव्हा ते.'' शरदच्या आवाजात काही फारसा उत्साह नव्हता.

''आणि हे सर्व जाहीर केव्हा करायचं? अजून आम्हांला पण तू तुझी ट्रिक सांगितली नाहीस! प्रथम आमच्यापुढे एक सेमिनार दे.'' 'आम्ही' म्हणजे नरेश आणि त्याचे प्रयोगातले इतर सहकारी.

''विचार करून ठरवू काय करायचं ते. तू मात्र अजून सर्व गुप्त ठेव.'' शरदने त्याला कटवले.

''नरेशचा फोन होता. प्रयोग शंभर टक्के यशस्वी झाला. पण अजून तू देखील कोणाला सांगू नकोस.'' शरदने जवळच उभ्या असलेल्या सरिताला सांगितले.

''पण तू काही आनंदात दिसत नाहीस! ही तुझी डिस्कवरी तू केव्हा प्रसिद्ध करणार?'' सरिताने विचारले.

''नाही सरिता! मी आनंदात नाही. प्रयोग सफल झाल्याचं मला समाधान आहे, पण हा शोध मी लावला याचा आनंद नाही. फार काय, हा शोध लागला याचंच मला वाईट वाटतं... आणि मी हा दाबून टाकणार!''

''म्हणजे? मला काही कळतच नाही तुझं काय लॉजिक आहे ते – '' सरिता तक्रारीच्या स्वरात म्हणाली.

''लॉजिक स्पष्ट आहे – पण ते खुद्द मलाच दिसायला वेळ लागला. तेव्हा तुला न पटणे साहजिक आहे. जो प्रयोग यशस्वी करण्यासाठी मी गेले काही

वर्षे सतत झटलो तो आता मीच होता की नव्हता करणार! कारण? – अजून हा प्रयोग जाहीर करण्यासारखी परिस्थिती नाही.

मी ब्रजेशला भेटून आलो तेव्हा माझे डोळे उघडले. जाता जाता मी त्याला सहज विचारलं की, त्याच्याकडे आलेल्या किती जोडप्यांनी कन्यारत्नाची मागणी केली? त्यानं उत्तर दिलं – एकानंही नाही!

कल्पना कर! जर सध्याच्या परिस्थितीत हा शोध जाहीर झाला तर त्याचे काय परिणाम होतील? नर आणि नारी यांच्यात समतोल ठेवण्याची निसर्गाची प्रवृत्ती कुठच्या कुठे जाईल. मुलग्यांचं प्रमाण भरमसाट वाढेल आणि त्यातून अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होतील. मुलींचं प्रमाण कमी झालं की मानवजातीची पुढची वाढच खुंटेल... कुठलाही सामान्य माणूस स्वतःपुरताच विचार करतो. पण सर्व जनसमुदाय त्याच विचाराचा असला तर कसं संकट निर्माण होऊ शकतं. ब्रजेशला त्याच्या खेड्यात हा अनुभव आला.''

''पण योग्य नियंत्रणाखाली ह्या शोधाचा उपयोग होणार नाही का?'' सरिताने विचारले.

''नियंत्रण! कोण घालणार नियंत्रण? ॲटमबाँबचा शोध लागला तेव्हा ही नवी भयंकर शक्ती नियंत्रणाखाली राहील असं वाटलं होतं. पण तिचा किती प्रसार झाला ते आपण पाहतोच. शास्त्रज्ञ बरेच वेळा निसर्गानं दडवून ठेवलेली गुपितं शोधण्याच्या मागे असताना, ती गुपीतं मानवजातीला पेलतील की नाही याचा विचार करत नाही. 'विद्ययाऽमृतमश्नुते' ह्या सूक्ताचा अर्थ मला आता कुठे कळायला लागला आहे. निसर्गाकडे मानवजातीच्या कल्याणाकरता अनेक गोष्टी आहेत. पण त्या गोष्टी पचायला मानवजातीत मानसिक परिपक्वता पाहिजे. ती नसली तर त्या शोधांनी कल्याणाऐवजी अकल्याणच होईल.

मला लागलेला शोध अचानक लागला. तो ओघाओघाने लागला तर कदाचित पुढल्या शतकात लागला असता. तोपर्यंत मानवजात बौद्धिक दृष्ट्या जास्त परिपक्व झालेली असेल. सध्या ती परिस्थिती नाही.''

''मग तू काय करायचं ठरवलं आहेस?'' सरिताला शरदचा मुद्दा पटलेला दिसत होता.

''ठरवलं? नाही, करूनच टाकलंय. काल रात्रीच परत आल्यावर मी प्रयोगशाळेत गेलो आणि माझ्या सर्व नोट्स जाळून टाकल्या. आता माझ्या डोक्याशिवाय त्या शोधाचं सध्या तरी ह्या जगात अस्तित्व नाही!'' शरद उद्गारला.

“आणि औषधाच्या बाटल्या?” सरिताने विचारले - पण शरद काय सांगणार याची तिला आगाऊच कल्पना होती.

“त्या उद्या नरेशला ॲनॅलाइझ करायला देईन. त्याला त्यात सापडेल फक्त शुद्ध पाणी - एच टू ओ!” शरद हसत म्हणाला.